# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


## प्रेस नोट

दिनांक 11/02/2021 (गुरूवार)

(सकाळ)

---

### गैरकायदयाची मंडळी

पो.स्टे. बुटीबोरी :– अंतर्गत 01 कि.मी अंतरावर मौजा साई पार्क बुटीबोरी येथे दिनांक 09/02/2021 चे 17.30 वा. दरम्यान आरोपी क्र. 1) गणेश डेहारे याने त्याचे मोबाईल वरून फिर्यादी नामे– गोपाल साहेबराव धुगे, वय 32 वर्ष, रा. रेवतकर ले–आउट बोथली ता.जि. नागपूर याला फोन करून म्हटले की, ''तु कोठे आहे'' असे विचारणा करून आरोपी क्र. 1) गणेश डेहारे, 2) संजय उताणे, 3) संजय उताणे याचा ड्रायव्हर सर्व रा. तलमले आउट बुटीबोरी व सोबत असलेले 3 अनोळखी आरोपी हे फिर्यादी जवळ मोटरसायकलने जावून गैरकायद्याची मंडळी गोळा करून आरोपी क्र. 1. याने फिर्यादीस ''तु जास्त फळफळ करतोस का'' असे म्हणून त्याचा हात मुरगाळून आरोपी क्र. 2 ते 6 यांनी हातबुक्यांनी व लाथांनी मारहाण करून जिवाने मारण्याची धमकी दिली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. बुटीबोरी येथे आरोपीतांविरुध्द कलम 143,144,323,506 भादंवी अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीतांचा शोध घेणे सूरू असून गुन्हयाचा पुढील तपास सफौ धुर्वे 9823836457 हे करीत आहे.

### अपघातात मृत्यु

1) पो.स्टे. देवलापार :– अंतर्गत 9 कि.मी. अंतरावरील मौजा रयतवाडी बस स्टाप समोर एन 44 रोड येथे दिनांक 09/02/2021 चे 18:30 वा. ते 19.00 वा. दरम्यान आरोपी/मृतक नामे– मुकेश मोहनलाल छत्तानी, वय 34 वर्ष, रा. सिंधी कॉलनी दुर्गामंदीर सिवनी राज्य म.प्र. हा त्याचे एमपी–22/एमके–7450 क्रमांकाच्या मोटरसायकलने देवलापार कडून सिवनी म.प्र. कडे जात होता. त्यादरम्यान रयतवाडी बस स्टाप समोर एनएच 44 रोडवर आरोपीने त्याच्या ताब्यातील मोटरसायकल भरधाव वेगाने व निष्काळजीपणे एक सायकल स्वार इसमास पाठीमागुन धडक दिली. सायकल स्वारास किरकोळ जखमी झाला तर आरोपी यास डोक्याला रोडचा मार लागल्याने त्यास डॉक्टरानी तपासून मृत घोषित केले. आरोपी हा स्वतःचे मरणास कारणीभुत ठरला.

सदर प्रकरणी सरतर्फे पोलिस नाईक सनतलाल मरकाम पोस्टे देवलापार यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. देवलापार येथे आरोपी चालकाविरुध्द कलम 279, 337, 304 (अ) भादंवी. सहकलम 184 मोवाका कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोउपनि पुजंरवाड मो.नं. 9668865203 हे करीत आहे.

2) पो. स्टे. कळमेश्वर :– अंतर्गत 4 कि.मी. अंतरावरील मौजा दहेगाव नागपूर येथे दिनांक 10/02/2021 चे 08:30 वा. दरम्यान एमएच–31/एपी–4116 क्रमांकाचा आयशर गाडीचा चालक आरोपी नामे– स्वपनिल गोपीचंद तिरपुडे, वय 33 वर्ष, रा. पिवळी नदी, कामठी रोड, जि. नागपूर याने आपल्या ताब्यातील वाहन भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवुन पायी जाणाऱ्या फिर्यादींच्या आईला मागुन धडक दिली. या अपघातात फिर्यादीची आई नामे– चंद्रकला कृष्णाजी जुनघरे, वय 60 वर्ष, रा. येरला यांच्या डोक्याला मार लागुन त्यांचा जागेच मृत्यु झाला.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– जितेन्द्र कृष्णाजी जुनघरे, वय 37 वर्ष, रा. येरला पो.स्टे फेटरी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. कळमेश्वर येथे आरोपी चालकाविरुध्द कलम 304 (अ) भादंवी. सहकलम 134, 184 मोवाका कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोउपनि बुंदे मो.नं. 9850881987 हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष

नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर